तरुण भारत

सोमवार २७ डिसेंबर २०२१

# पाटील, मोरे यांची राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड

**गडहिंग्लज :** येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात रोहिणी पाटील, विवेक मोरे यांची राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शिरोळ येथे झालेल्या जिल्हा संघ निवड चाचणीमध्ये रोहिणी पाटील, विवेक मोरे यांनी यश संपादन केले. जत येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी कोल्हापूर जिल्हा संघात निवड झाली आहे. खेळाडूंना संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, महेंद्र जाधव, कविता पोळ, लिपीक प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन तर क्रीडा शिक्षक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन लाभले.